26-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/26/2025 12:10 AM Page 1

चोडण फेरी दुर्घटनेच्या निषेधार्थ काँग्रेसचा आरएनडी कार्यालयावर मोर्चा

- सरकारवर निष्काळजीपणाचा आरोप
- ' हा अपघात नव्हे, भाजपचे अपयश '

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २५ : चोडण येथे नुकत्याच घडलेल्या फेरी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर कॉन्ग्रेसने बुधवारी बेती येथील नदी परिवहन विभागाच्या कार्यालयावर जोरदार मोर्चा काढत राज्य सरकारच्या निष्काळजी धोरणांवर आणि पायाभूत सेवांतील अपयशावर तीव्र निषेध नोंदवला.काँग्रेसने आरोप केला की ही दुर्घटना ही योग्य देखभाल, प्रशासनाची जबाबदारी आणि पारदर्शक कार्यप्रणाली यांचा अभाव यामुळे घडलेली घटना असून, ती केवळ अपघात न राहता सरकारी अपयशाचा गंभीर परिणाम आहे.

यावेळी गोवा प्रदेश कॉन्ग्रेसचे चे नेते आणि कार्यकर्ते जोरदार घोषणाबाजी करत नदी परिवहन विभागाच्या कार्यालयाच्या बाहेर जमले. त्यांनी आरएनडी आणि राज्य प्रशासनाकडून उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेची मागणी केली. आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांनी सरकारवर सार्वजनिक सुरक्षेबाबत गंभीर तडजोड केल्याचा आरोप केला.

गोवा प्रदेश कॉन्ग्रेसच्या प्रवक्त्यांनी निदर्शनादरम्यान स्पष्टपणे सांगितले की,ही फेरी दुर्घटना केवळ एक तांत्रिक चूक नव्हे, तर भाजपच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने महत्त्वाच्या सार्वजनिक पायाभूत सेवांकडे दाखवलेला उदासीन आणि भ्रष्ट दृष्टिकोन याचेच द्योतक आहे.ते पुढे म्हणाले की, गोव्यातील अनेक फेरीसेवा बेटांतील नागरिकांचे जीवनवाहन आहे आणि अशा सेवा कमी दर्जाच्या देखभालीमुळे धोक्यात येत आहेत.चोडण दुर्घटनेमुळे फेरी व्यवस्थेतील ढासळलेल्या स्थितीकडे जनतेचे लक्ष वेधले गेले असून काँग्रेसने या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची तसेच भविष्यातील अशा घटनांना आळा घालण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

गोवा प्रदेश कॉन्ग्रेसच्या नेत्यांनी इशारा दिला की,जोपर्यंत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली जात नाही आणि फेरी व्यवस्थेतील सुधारणा अमलात आणली जात नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरू राहील. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या आंदोलनामुळे नदी परिवहन विभाग कार्यालय परिसरात तणाव निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला होता. आंदोलकांनी शांततेत आंदोलन केले, मात्र त्यांचे भाष्य सरकारविरोधी आणि आक्रोशपूर्ण होते.

फेरी बोट बुडल्याची घटना सोमवारी पहाटे घडली. चोडण बेटाच्या किनाऱ्यावर नांगरून ठेवलेली एक फेरी बोट पाण्यात बुडाली. सुदैवाने त्यावेळी जहाजावर प्रवासी नव्हते आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेने फेरी व्यवस्थेतील त्रुटींना अधोरेखित केल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

माउंट लिटेरा शाळेला बॉम्बची धमकी बनावट असल्याचे निष्पन्न

■ टीम दैनिक हेराल्ड

वास्को, दि. २५ : झुआरीनगर येथील माउंट लिटेरा झी स्कूलमध्ये बुधवारी सकाळी बॉम्ब ठेवण्यात आल्याचा संदेश मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ उडाला, तर पालक आणि शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने, तपासाअंती ही धमकी बनावट असल्याचे स्पष्ट झाले.

सकाळी ९:१५ वाजता शाळा प्रशासनाला धमकीचा ईमेल किंवा संदेश मिळाल्यानंतर, मुख्याध्यापिका संध्या वेंकटेश यांनी तत्काळ मुरगाव पोलिसांना संपर्क साधला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मोरमुगावचे पोलीस उपायुक्त गुरुदास कदम यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची टीम, बॉम्ब शोधक आणि निकामी करणारे पथक तसेच आपत्कालीन सेवा तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्या.

शाळेचा संपूर्ण परिसर अत्यंत काटेकोरपणे तपासण्यात आला. बॉम्ब शोधक पथकाने शाळेच्या प्रत्येक वर्गखोली, मैदान, बॅगा आणि इतर भागांची सखोल तपासणी केली. कोणतेही स्फोटक किंवा संशयास्पद वस्तू आढळून आल्या नाहीत, त्यामुळे ही धमकी फक्त खोटा इशारा असल्याचे स्पष्ट झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

तपासात ही धमकी बनावट असल्याचे स्पष्ट झाले असले तरी आम्ही कोणताही धोका पत्करला नाही. अशा प्रत्येक परिस्थितीला अत्यंत गांभीर्याने घेतले जाते, असे उपायुक्त गुरुदास कदम यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

धमकी मिळाल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून सर्व विद्यार्थ्यांना वर्गांबाहेर काढून शाळेच्या मैदानात सुरक्षितपणे एकत्रित करण्यात आले.

खासदार विरुद्ध आमदार ; आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी

■ टीम दैनिक हेराल्ड

- विरियेतो आणि संकल्प यांच्यात टोकाची टीका

वास्को, दि. २५ : मुरगाव येथील सडा परिसरातील रोझ सर्कल मैदानाच्या विकासकामावरून मुरगावचे आमदार संकल्प आमोणकर आणि दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियेतो फर्नांडिस यांच्यात जोरदार शाब्दिक खडाजंगी उफाळून आली आहे. या विकासकामाच्या श्रेयावरून दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार आरोप–प्रत्यारोप सुरू झाले आहेत.

मंगळवारी आमदार संकल्प आमोणकर यांनी मैदानाच्या विकासकामांचे औपचारिक उद्घाटन करताना खासदार कॅप्टन फर्नांडिस यांच्यावर टीकास्त्र सोडले. कॅप्टन फर्नांडिस हे केवळ प्रसिद्धीसाठी स्टंट करत आहेत. मी कामाचा आदेश घेतल्यानंतर लगेच एनओसी दाखवले. जर त्यांना खरोखर एमपीएलएडी निधीतून प्रकल्प उभारायचा होता, तर ते आतापर्यंत काम का सुरू करू शकले नाहीत? हे लोक बनावट प्रचार करून जनतेची दिशाभूल करत आहेत, असा आरोप आमोणकर यांनी केला.

आमोणकर यांनी कॅप्टन फर्नांडिस यांच्यावर आणखी हल्ला चढवत कोळसा प्रदूषणाच्या मुद्द्यावरून त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. खासदार केवळ कोळसा व धूळ प्रदूषणावर बोलतात, पण प्रत्यक्ष मैदानात कुठेही दिसत नाहीत. ते दिल्लीत बसून अदानी आणि जिंदालसारख्या उद्योगपतींसोबत चहापान करत असतात. आमच्यावर आरोप करताना त्यांना काहीही आधार नाही. त्यांच्याविरोधात आमच्याकडे पुरावे आहेत, असा दावा करत आमोणकर यांनी त्यांना सार्वजनिक चर्चेसाठी वास्कोच्या दामोदर मंदिरात येण्याचे आव्हान दिले.

या आरोपांना उत्तर देताना कॅप्टन फर्नांडिस यांनी आमदार आमोणकर यांच्यावर जनतेच्या विश्वासाचा विश्वासघात केल्याचा आरोप केला. माझे जीवन हे एक उघडे पुस्तक आहे. आमोणकर यांनी काँग्रेसच्या तिकिटावर निवडून येऊन भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांनी मंदिर, चर्च आणि दर्ग्यात जाऊन पक्ष न सोडण्याची शपथ घेतली होती, पण तरीही त्यांनी पक्षांतर केले. त्यामुळे त्यांना माझ्यावर टीका करण्याचा नैतिक अधिकार नाही, असे फर्नांडिस म्हणाले.

कॅप्टन फर्नांडिस यांनी आमोणकर यांच्यावर मुरगाव बंदर परिसरातील कंपन्यांकडून १५ टक्के कमिशन घेण्याचा आणि लहान व्यावसायिक, रस्तावरील विक्रेते यांच्याकडून खंडणी वसूल करण्याचा गंभीर आरोप केला. त्यांनी मला मंदिरात बोलावण्याऐवजी या आरोपांना उत्तर द्यावे. मी कुठल्याही धार्मिक स्थळी चर्चेसाठी येण्यास तयार आहे. कारण मी विश्वासघातकी नाही, असे प्रतिपादन त्यांनी केले.

रोझ सर्कल मैदानाच्या विकासासाठी दोन्ही नेत्यांमध्ये सुरू असलेले श्रेयवादाचे राजकारण आगामी स्थानिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून रंगत चालले आहे. यामध्ये जनतेच्या हितापेक्षा राजकीय कुरघोडीला प्राधान्य दिले जात असल्याचे निरीक्षण राजकीय वर्तुळात नोंदवले जात आहे.

खलाशांच्या छळवणुकीविरोधात कारवाई करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २५ : जागतिक खलाशी दिनानिमित्त गोवन सीमन असोसिएशन ऑफ इंडिया (जीएसएआय)ने समुद्रातील खलाशांच्या सुरक्षेबाबत एक तीव्र आणि निर्णायक भूमिका घेत, जहाजांवरील छळवणुकीविरोधात तातडीने कारवाई करण्याची मागणी सरकारकडे केली आहे .

माझे छळवणूकमुक्त जहाज' ही या वर्षीची प्रमुख संकल्पना असून, जीएसएआयचे अध्यक्ष फ्रँक व्हिएगस यांनी एका निवेदनातून सांगितले की, ही थीम केवळ घोषवाक्य नाही; ती कृतीसाठीचा आवाज आहे. आता वेळ आली आहे जहाजांवर होणाऱ्या मानसिक, शारीरिक, भावनिक आणि व्यावसायिक छळवणुकीविरोधात आवाज उठवण्याची.'

व्हिएगस पुढे म्हणाले की, अनेक खलाशी हे अन्याय सहन करीत असून त्यांच्या व्यथा गप्प राहून दडपल्या जात आहेत.

व्हिएगस यांनी नुकत्याच एका सर्वेक्षणाचा दाखला देत सांगितले की, ८२% खलाशांना वाटते की जहाजांवरील डिजिटलायझेशनमुळे त्यांचा प्रशासनिक ताण वाढला आहे.एकेकाळी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सुरू झालेल्या तंत्रज्ञानाने आता भरमसाठ डिजिटल फॉर्म, ऑडिट आणि अनुपालनाची कामे खलाशांवर लादली आहेत. परिणामी त्यांचा विश्रांतीचा वेळ आणि कामाची गुणवत्ता दोन्ही घटली आहे, असे ते म्हणाले.

जीएसएआयने खलाशांच्या कल्याणासाठी सुरू केलेल्या उपाययोजनांत सागरी कायदेतज्ज्ञ आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी भागीदारी करून कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळवणुकीविरोधात पीडित खलाशांना न्याय मिळवून देणे , खलाशांना समुपदेशन सेवा आणि भावनिक पाठिंबा पुरवण्याचा उपक्रम राबवणे , तसेच आयएमओ , आय टीएफ आणि जहाजमालक गटांशी सहकार्य करत भारतीय खलाशांचे हक्क अधिक भक्कमपणे मांडणे इत्यादी गोष्टींचा समावेश आहे .

व्हिएगस यांनी स्पष्टपणे सांगितले की, छळ ही पीडित व्यक्तीची कमजोरी नसून, ती व्यवस्थेतील गंभीर त्रुटीचे लक्षण आहे. जहाज म्हणजे सन्मान, प्रतिष्ठा आणि सहकार्याचे स्थान असले पाहिजे. भीतीचे नव्हे.

जीएसएआयने गोवा सरकारचे सीफेअर्स पेन्शन योजनेसाठी विशेष आभार मानले आणि केंद्र सरकार तसेच शिपिंग महासंचालनालयाकडे खलाशांच्या तक्रारींवर अधिक कठोर प्रतिसाद देण्याची मागणीकेली आहे.

साळवली धरण १२ दिवस आधी ओव्हरफ्लो !

■ टीम दैनिक हेराल्ड

- धरणात साठलेल्या गाळाचा परिणाम ?

मडगाव, दि. २५ : दक्षिण गोव्यातील महत्त्वाचे जलसाठा असलेले साळवली धरण बुधवारी संध्याकाळी ५.३० वाजता ओव्हरफ्लो होऊ लागले. यंदाचा हा ओव्हरफ्लो गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल १२ दिवस आधी झाल्याची नोंद असून, अलिकडच्या काळातील ही सर्वात लवकर ओव्हरफ्लो होण्याची घटना ठरली आहे.

मागील वर्षी ७ जुलै रोजी संध्याकाळी ७.०७ वाजता धरणातील पाणी शिखरावर पोहोचले होते, तर २०२३ मध्ये १९ जुलै आणि २०२२ मध्ये ९ जुलै रोजी धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला होता. यावर्षी मान्सूनने वेळेपेक्षा आधीच गोव्यात हजेरी लावल्याने धरणाच्या पातळीत झपाट्याने वाढ झाली असल्याचे म्हटले जात असले तरीही हा वर्षानुवर्षांपासून धरणात साठलेल्या गाळाचा परिणाम असल्याचे बोलले जात आहे

नयनरम्य परिसरात वसलेले साळवली धरण हे केवळ पिण्याचे व सिंचनासाठी पाणी पुरवणारे महत्त्वाचे स्त्रोत नसून पर्यटक आणि स्थानिकांसाठीही एक आकर्षणाचे केंद्र आहे. या धरणाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे आशियातील पहिला डकबिल स्पिलवे कार्यरत आहे, जो मुसळधार पावसात अतिरिक्त पाण्याचा विसर्ग कार्यक्षमतेने करतो.

धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्यामुळे परिसरात सावधगिरी बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. जलसंपदा मंत्री सुभाष शिरोडकर यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया देताना सांगितले की, पावसाळा जोरात सुरू असल्यामुळे राज्यातील इतरही धरणे लवकरच भरून वाहू शकतात, मात्र नागरिकांनी घाबरून जाण्याचे काहीही कारण नाही.

जवळपासच्या गावांतील लोकांनी घाबरण्याचे कारण नाही. पाऊस सुरू झाला असल्याने सर्व धरणे ओव्हरफ्लो होणारच. मात्र, कोणताही धोका नाही. सर्व सुरक्षा व्यवस्था सज्ज असून, दरवाजे उघडे ठेवण्यात आले आहेत, असे शिरोडकर यांनी स्पष्ट केले.

धरणातील वाढती पाणीपातळी आणि राज्यात सुरू असलेला मुसळधार पाऊस पाहता, आगामी काही दिवसांत आणखी धरणांमधून विसर्ग सुरू होण्याची शक्यता प्रशासनाने वर्तवली आहे. स्थानिक नागरिकांना आणि पर्यटकांना स्पिलवेच्या परिसरात अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

adventz
ZUARI AGRO CHEMICALS

झुआरी ॲग्रो केमिकल्स लिमिटेड

सीआयएनः एल 65910जीए2009पीएलसी006177
नोंदणीकृत कार्यालयः जय किसान भवन, झुआरी नगर, गोवा - 403726 , टेली: 91-0832-2592431
ई-मेलः shares@adventz.com, वेबसाईटः www.zuari.in

टपाल मतपत्रिका सूचना

झुआरी ॲग्रो केमिकल्स लिमिटेडच्या सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की, कंपनी कायदा, **2013** (कायदा) चे कलम **108, 110** व इतर लागू तरतुदी, कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, **2014** चे नियम **20** व **22** (कोणत्याही सुधारणा, सांविधिक सुधारणा किंवा वेळोवळी अमलात आलेल्या त्यासाठीचे आदेश यांच्या अंतर्भावासह) यांसह कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने प्रसिद्ध केलेले **8** एप्रिल **2020** रोजीचे सर्वसामान्य परिपत्रक क्र. **14/2020, 13** एप्रिल **2020**रोजीचे **17/2020** आणि दि. **19** सप्टेंबर **2024** रोजी हल्लीच पारित केलेले सर्वसामान्य परिपत्रक क्र. **09/2024** यांसह त्यानंतरची यासंबंधीची परिपत्रके, **(एमसीए परिपत्रके)**, सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमने, **2015** चे नियमन **44** (लिस्टींग रेग्युलेशन्स), (कोणत्याही सुधारणा, सांविधिक सुधारणा किंवा वेळोवळी अमलात आलेल्या त्यासाठीचे आदेश यांच्या अंतर्भावासह) आणि इतर कायदे व नियमने यांच्या अनुषंगाने, काही असल्यास, झुआरी ॲग्रो केमिकल्स लिमिटेडच्या (कंपनी) सदस्यांना नोटीस देण्यात येते की दि. **14** मे **2025** रोजीच्या टपाल मतपत्रिका सूचनेत अधिक विस्ताराने दिल्यानुसार कंपनीचे अ–कार्यकारी (नॉन एक्झिक्युटीव्ह) आणि कंपनीचे स्वतंत्र संचालक संचालक म्हणून श्री. संजीव लाल (डीआयएन : **08740906**) यांची पुनर्नेमणूक चालू ठेवण्यासाठी सामान्य ठराव पारित करण्यासाठी रिमोट ई–मतदान प्रक्रियेने (ई–मतदान) टपाल मतपत्रिकांद्वारे सदस्यांची मान्यता कंपनीला हवी आहे.

एमसीए परिपत्रकांच्या अनुषंगाने सदर टपाल मतपत्रिका कंपनी किंवा डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/एमयूएफजी इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडे ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले आहेत आणि **शुक्रवार 20 जून 2025 रोजी (कट ऑफ तारीख)** कामकाज संपण्याच्या वेळी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) यांचेकडून मिळालेल्या लाभार्थी मालक यादीत/सदस्य नोंदवहीत ज्यांची नावे आलेली आहेत त्या सदस्यांना **बुधवार 25 जून 2025 रोजी** इलेक्ट्रॉनिक रितीने पाठवण्यात आल्या आहेत. एमसीए परिपत्रकांच्या आवश्यकतांचे पालन करून टपाल मतदान प्रपत्रांसह टपाल मतपत्रिकांची सूचनांच्या छापील प्रती आणि प्रीपेड बिझनेस लखोटे या टपाल मतपत्रिकांसाठी सदस्यांना पाठवले जाणार नाहीत आणि भाग धारकांना विनंती आहे की, त्यांनी टपाल मतपत्रिका सूचनेत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात आणि फक्त ई–मतदानाने त्यांची मंजुरी (त्यासाठीची) किंवा नकार (विरुद्ध) कळवावा.
सदर टपाल मतदानपत्रिका कंपनीच्या **www.zuari.in** या संकेतस्थळावर व तसेच स्टॉक एक्स्चेंजेसच्या म्हणजे नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि. च्या आणि बीएसई लिमिटेडच्या अनुक्रमे **www.nseindia.com** व **wwwwww.bseindia.com** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहेत. तसेच त्याची एक प्रत सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया)लिमिटेड (सीडीएसएल) च्या **www.evotingindia.com** या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध आहे.
कंपनीने ई–मतदान सुविधा पुरवण्यासाठी सीडीएसएलच्या सेवा घेतल्या आहेत. ई–मतदानाच्या सूचना टपाल मतपत्रिका सूचनेत दिल्या आहेत.
श्री. शिवराम भट, कार्यरत कंपनी सचिव (सदस्यता क्र. **10454**) यांची टपाल मतदान प्रक्रिया स्वच्छ व पारदर्शक रितीने घेण्यासाठी अन्वेषक म्हणून कंपनीच्या संचालक मंडळाने नेमणूक केली आहे.
कंपन्या कायदा, **2013** च्या तरतुदी व सदर नियमांच्या अनुषंगाने तपशील येथे खाली दिला आहे :

1. ईमेलद्वारे नोटीस पाठवणे पूर्ण केल्याची तारीख : **बुधवार 25 जून 2025**
2. ई–मतदान सुरू करण्याची तारीख व वेळ : **रविवार 29 जून 2025 (सकाळी 10.00) (भा.प्र.वेळ)**
3. ई–मतदान संपण्याची तारीख व वेळ : **सोमवार 28 जुलै 2025(संध्या. 5.00) (भा.प्र.वेळ)**
4. ई–मतदान **सोमवार 28 जुलै 2025 (संध्या. 5.00)** नंतर करण्यास परवानगी नाही.
5. सर्व सदस्य, ज्यांची नावे कट–ऑफ तारखेला म्हणजे **शुक्रवार 20 जून 2025 रोजी** सदस्य नोंदवही/लाभार्थी सदस्य यादीत आली आहेत ते ई–मतदान सुविधेचा लाभ घेण्यास पात्र राहतील. कटऑफफ्र तारखेला कोणीही व्यक्ती सदस्य नाही त्यांनी ही सूचना केवळ माहितीसाठी आहे असे समजावे.
6. मतदान कालावधी संपल्यावर, सीडीएसएलद्वारे ई–मतदान मोड्यूल निकामी करण्यात येईल व त्यानुसार मतदान करता येणार नाही, सदस्याने एकदा मत दिल्यावर, त्याला /तिला ते मत त्यानंतर बदलता येणार नाही.
7. ठराव, आवश्यक बहुसंख्येने पारित झाल्यास, तो **सोमवार 28 जुलै 2025 रोजी** म्हणजे ई–मतदान कालावधीच्या अंतिम दिवशी पारित झाला आहे असे गृहित धरले जाईल.
8. टपाल मतपत्रिकांचे निकाल कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात **मंगळवार 29 जुलै 2025 रोजी** जाहीर केले जातील आणि तसेच ते नोंदणीकृत कार्यालायच्या सूचना फलकावर लावले जातील व कंपनीच्या **www.zuari.in** या संकेतस्थळावर प्रदर्शित केले जातील. सदर निकाल स्टॉक एक्स्चेंजेसला कळवले जातील.

९. सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया)लिमिटेड (सीडीएसएल) ई–मतदान सिस्टीमद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्यासाठीच्या सुविधेसंबंधी असलेले सर्व विवाद व चौकश्या श्री. राकेश दळवी, वरिष्ठव्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया)लिमिटेड, ए–विंग, **25** वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड, एन एम जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई–**400013** यांना उद्देशून करावा किंवा **helpdesk.evoting@cdslindia.com** येथे ईमेल पाठवावी किंवा टोल फ्री क्र. **1800 21 09911** यावर संपर्क करावा. वैयक्तिक शेअरधारक ज्यांनी नएसडीएलकडे डीमॅट स्वरुपात सिक्युरिटीज धारण केलेले आहेत व त्यांना लॉगइन करण्यात कोणत्याही तांत्रिक समस्येला सामोरे जावे लागत असल्यास त्यांनी **evoting@nsdl.co.in** यावर एनएसडीएल हेल्पडेस्कला ईमेल पाठवून विनंती करावी किंवा **022-48867000** व **022-24997000** वर संपर्क करावा.

ईमेल पत्त्याची नोंदणी
कंपनीचे सदस्य, ज्यांनी त्यांचे बरोबर ईमेल पत्ते अजूनही नोंदणीकृत किंवा अपडेटेड केलेले नाहीत त्यांना विनंती आहे की त्यांनी ते खालील पद्धतीने नोंदणीकृत / अपडेट करावेत :

1. **भौतिक पद्धतीने शेअर्स धारण केलेल्या शेअरहोल्डर्ससाठी** : शेअर सर्टिफिफ्रकेटची (पुढील व मागील बाजू) स्कॅन्ड प्रत, पॅनची प्रत (स्व–साक्षांकित), आधार कार्डाची प्रत (स्व–साक्षांकित) यांसह फफ्रोलिओ क्र., शेअरहोल्डरचे नाव, मोबाईल क्र., ईमेल आयडी जी नोंदणीकृत करावयाची आहे असा तपशील दिलेले फॉर्म आयएसआर–**1** मधील विनंती पत्राची सही केलेली प्रत ईमेलद्वारे कंपनीच्या **shares@adventz.com** येथे / **rnt.helpdesk@in.mpms.mufg.com** येथे आरटीए करावी वा पाठवावी. सदस्य कंपनीच्या **http://www.zuari.in/investor/investor/kyc compilance** या संकेतस्थळावरून सदर विहित फॉर्म डाऊनलोड करू शकतील.
2. **डीमॅट शेअरहोल्डर्ससाठी** : कृपया तुमच्या डिपॉझिरी पार्टिसिपंट (डीपी) ला संपर्क करा आणि तुमचा ईमेल पत्ता नोंदणीकृत करा व तुमच्या डीपीने दिलेल्या सल्ल्यानुसार प्रक्रियेने तुमचे डिमॅट अकाऊंटमधील बँक खाते तपशील नोंदणीकृत करा.

झुआरी ॲग्रो केमिकल्स लिमिटेडकरिता
सही/–
अशीबा परेरा
कंपनी सचिव

दि. : 25 जून 2025